**SCHEDULE I**

**FORM A**

**PUBLIC ANNOUNCEMENT**

(Regulation 14 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Voluntary Liquidation Process) Regulations, 2017)

**FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF SM LINE CORPORATION (INDIA) PRIVATE LIMITED**

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of the Corporate Person | **SM LINE CORPORATION (INDIA) PRIVATE LIMITED** |
| 2. | Date of Incorporation of Corporate Person | 15/02/2017 |
| 3. | Authority under which Corporate Person is incorporated/registered | Registrar of Companies, Mumbai. |
| 4. | Corporate Identity Number/Limited Liability Identity Number of corporate person | U63030MH2017FTC291209 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of Corporate Person | **Registered Office Address:** 1306/2, Vijay Galaxy, Waghbil Naka, Ghodbunder Road, Thane (West) Mumbai City MH 400615 IN |
| 6. | Liquidation Commencement date of Corporate Person | 18th April, 2023 |
| 7. | Name, address, email address, telephone number and the registration number of the Liquidator | **Mr. Pranav Damania**<br>**IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164**<br>Address: - 407, Sanjar Enclave, Above Mahindra Showroom, Opposite Milap Cinema, S.V Road, Kandivali West, Mumbai - 400067.<br>Email Id :- pranav@winadvisors.co.in<br>Alternate e-mail id:- pranav@consultinsolvency.com<br>Cell :- +9198204 69825 |
| 8. | Last date for submission of claims | **Within 30 days from the Liquidation Commencement date** |

Notice is hereby given that the **SM LINE CORPORATION (INDIA) PRIVATE LIMITED** has commenced voluntary liquidation on **18th April, 2023.**

The stakeholders of **SM LINE CORPORATION (INDIA) PRIVATE LIMITED** are hereby called upon to submit a proof of their claims, on or before 18th May, 2023, to the liquidator at the address mentioned against item 7.

The Financial creditors shall submit their proof of claims by electronic means only. All other stakeholders may submit the proof of claims in person, by post or by electronic means.

**Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.**

Pranav Damania
Liquidator for **SM LINE CORPORATION (INDIA) PRIVATE LIMITED**
**Registration number - IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164**
**Authorization for Assignment ("AFA")**
**AFA No.: AA1/10164/02/231223/105289**
**AFA Validity: December 23rd, 2023**

Date: April 19, 2023
Place: Mumbai

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# भारत खेड्यांचा नव्हे शहरांचा देश

भारत हा खेड्यांचा देश म्हणून अजूनही ओळखला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी साठ ते सत्तर टक्के जनता खेड्यामध्ये राहाते. म्हणजे देशाची अर्थव्यवस्था इथल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. इतके महत्व ज्या खेड्यांना आहे त्या ग्रामीण भागाची पुढच्या पंचवीस वर्षात काय परिस्थिती असेल याचा जर विचार केला तर अगदी उशीरात उशीरा म्हणजे २०७० नंतर भारत हा खेड्यांचा नव्हे तर शहरांचा देश म्हणूनच ओळखला जाईल. अगदी अलीकडेच जागतिक बँकेनी एक अहवाल प्रसिद्ध करून जगातील अनेक देशांमधली आर्थिक , सामाजिक परिस्थिती कशी असेल याबद्दलचे सर्वेक्षण केले आहे. ज्यामध्ये जगातल्या अनेक देशात शहरीकरण किंवा नागरीकरण वेगाने होत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. २०५० पर्यंत भारतातील ७० टक्के खेड्यांचे शहरीकरण झालेले असेल असाही महत्त्वाचा निष्कर्ष त्यात मांडला आहे. आता वेगाने बदलणाऱ्या या सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे स्वागत करायचे की चिंता व्यक्त करायची असा संभ्रम निर्माण होऊ शकतो. जागतिक पातळीवर विकासाच्या ज्या काही व्याख्या केल्या जातात किंवा एकूणच प्रगतीचे जे काही मॉडेल सांगितले जाते त्यामध्ये शहरीकरणाला प्राधान्य असल्याचे दिसून येते. जितके शहरीकरण जास्त तितका त्या देशाचा विकास जास्त. म्हणजेच जीवनासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांची अधिकाधिक निर्मिती ही शहरांमध्ये वेगाने होते. त्या तुलनेमध्ये खेडी दुर्लक्षित राहातात. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा शंभर टक्के पूर्ण होत नाहीत. आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि शुद्ध पाणी या मूलभूत सुविधाही खेड्यामध्ये उपलब्ध होत नाहीत. म्हणजेच त्यांचा विकास झालेला नाही. हे समिकरण गृहित धरले जाते. किंबहुना अशा अनेक गोष्टींपासून वंचित असलेली लोकवस्ती म्हणजेच खेडे असा त्याचा दुसरा अर्थ होतो. दुसरा मुद्दा शिल्लक राहातो तो असा की शांत, संयमित, ताणतणाव विरहित आणि गरजेपुरत्या सुविधांवर समाधान मिळण्याचे ठिकाण म्हणजे खेडे अशी जी काही एक परंपरागत धारणा आहे. स्वच्छ, हवा, शुद्ध पाणी किंवा पर्यावरण पूरकता ही खेड्यांची वैशिष्ट्ये विकासाच्या वरवंट्याखाली भरडून निघतात हेही तितकेच खरे आहे.

**विकासाची नवी व्याख्या**

जागतिक बँकेने दिलेला अहवाल हा वस्तुस्थिती निदर्शक आहे यात काही शंका नाही. कारण खेड्यांची शहरे होणे आणि मग अनेक खेड्यांचे मिळून एका मोठ्या महानगरात परिवर्तन होणे हीदेखील एक स्वाभाविक प्रक्रिया ठरते. सुविधांचा अभाव किंवा गैरव्यवस्था म्हणजे खेडे ही समजूत आता भविष्यकाळामध्ये नाहीशी होणार आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे आणि काही प्रमाणात रोजगाराच्या विकेंद्रीकरणामुळे विकासाच्या अनेक संधी खेड्यांपर्यंत पोचू लागल्या आहेत. प्रसार माध्यमांमुळे एकूणच जगामध्ये घडणाऱ्या घडामोडींची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तंत्रज्ञानाचा उपयोग करून काही रोजगाराच्या संधीदेखील खेड्यामधून मिळू लागल्या आहेत. शेती व्यवसाय हा जो खेड्याचा एक अंगभूत भाग मानला जातो. त्या शेती व्यवसायातही आता तंत्रज्ञानाचा किंवा आधुनिक साधनांचा वापर होतो आहे. खेड्यांमधली जुन्या पद्धतीची घरे हळू हळू नाहीशी होत आहेत आणि त्या ठिकाणी आधुनिक स्वरूपात बंगले तयार होऊ लागले आहेत. मोठ्या शहरांबरोबर खेड्यांचाही या ना त्या कारणाने विस्तार होत असल्याने शेतामध्येच घरे बांधण्याचे प्रकारही पाहायला मिळतात. अधिक नेमकेपणाने सांगायचे तर शहरं आणि खेड्यांमधले अंतर कमी होऊ लागले आहे. काही खेडी आता त्या शहराचाच एक भाग वाटू लागतात. किंबहुना अनेक शहरांना अनेक जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचे काम खेड्यांमधूनच होत राहातो. खेड्यांचे बदलणारे हे रूपडं म्हणजे शहरांचं भविष्यकाळातले हे प्रतिबिंब आहे. तंत्रज्ञानामुळे खेड्यांचे हे शहरीकरण प्रचंड वेगावान होत असल्याने जागतिक बँक म्हणते त्याप्रमाणे भविष्यकाळात खेड्यांचे आपले स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व राहाणार नाही. असे म्हणता येते. अशा प्रकारचा शहरीकरणाच्या दिशेने चाललेला विकासाचा प्रवास हा शाश्वत मानायचा का. एवढाच काय तो मुद्दा विचारात घ्यावा लागतो. कारण लोकसंख्या आणि त्यांच्यासाठी आवश्यक सोयीसुविधा केल्याने शहरांना येणारी ही सूज समस्या निर्माण करताना दिसते.

**स्वयंपूर्ण छोटी शहरे हवीत**

यासगळ्या बदलत्या परिस्थितीचा विचार करताना ज्यांना आपणविकास म्हणतो ते फक्त शहरांशी केंद्रीत होऊन चालणार नाही. कारण शहरातून निर्माण होणाऱ्या समस्या या ताण निर्माण करतात आणि त्यातून तणावालाही आमंत्रण मिळते. याउलट खेड्यांमध्ये लोकसंख्या मर्यादित राहाते. सोयीसुविधादेखील मर्यादित ठेवता येतात. म्हणजेच विकासाचे नवे मॉडेल तयार करताना केवळ खेडे किंवा ग्रामीण भाग असे लेबल न लावता स्वयंपूर्ण छोटी शहरं असे जर त्याचे स्वरूप करता आले तर ते जास्त योग्य ठरेल. महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडलेली होती आणि शहराकडून खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. त्यामागेसुद्धा स्वयंपूर्णता, रोजगार, मनःशांती आणि समाधान असे हेतू होते. म्हणजेच भविष्यकाळामध्ये भारत खेड्यांच्याऐवजी शहरांचा देश होणार असेल तर ती स्वयंपूर्ण छोटी शहरं असणे हे भारतासाठी केव्हाही लाभदायकच राहणार आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला भारतासारखा देश आणि शेतीमधून मिळणारा मोठा रोजगार याची शहरीकरणाशी सांगड घालताना खूप सावधानता बाळगावी लागेल. अन्यथा मर्यादेपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरं बकाल आणि बजबजपुरीच निर्माण करतील. सामाजिक अस्वस्थता किंवा अनारोग्य वाढण्याची भीती आहे. अनेक प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती लाभलेल्या भारताला स्वयंपूर्ण खेडी टिकवून ठेवणं किंवा त्यांना स्वयंपूर्ण शहरं म्हणून नावारूपाला आणणं अधिक सोयीचं ठरू शकतं.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

येताना काहीच आणायचं नसतं तर...जातानाही काहीच न्यायचं नसतं. मग हे आयुष्य कोणासाठी जगायचं असतं ? खरं तर या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठीच आयुष्य सार्थकी लावायचं असतं.

**पंचांग**

गुरुवार, २० एप्रिल २०२३
शक १९४५ शोभननामसंवत्सर

चैत्र अमावास्या * नक्षत्र : अश्विनी



रवी उदय- ०६-१९
रवी अस्त- १८-५६

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

**अमावास्या सकाळी ९.४२ पर्यंत, वृषभायन दुपारी १.४३, ग्रीष्म ऋतू प्रारंभ, खंडग्रास सूर्यग्रहण दिसणार नाही, वज्रेश्वरी यात्रा-वसई, सोनापंत दांडेकर जन्मदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**



# लाल भोपळ्याचे घारगे

★ **साहित्य:-** ३ वाट्या लाल भोपळ्याचा किस, १ वाटी गूळ, एक चमचा जिरं, अर्धा चमचा मेथी दाणे, १ वाटी खोवलेलं ओलं खोबरं, पाव लहान चमचा हळद, १ चमचा तूप, स्वादानुसार मीठ, एक वाटी कणीक आणि अर्धा वाटी तांदळाचं पीठ, आवडीप्रमाणे खसखस, तळण्यासाठी तेल किंवा तूप

★ **कृती:-** एका कढईत तूप गरम करून त्यात भोपळ्याचा किस घालून वाफवून घ्या. मऊ शिजल्यावर गूळ घाला. मिश्रणाला उकळी आल्यावर गॅस बंद करून त्यात मीठ घाला. मिश्रण कोमट झाल्यावर यात ओलं खोबरं, जिरं, मेथी दाणे आणि हळद याची मिक्सरमध्ये बारीक वाटून घेतलेली पेस्ट घाला. मिसळून घ्या आणि मिश्रण गार होऊ द्या. मिश्रण थंड झाल्यावर त्यात मावेल तितकं कणीक-तांदळाचं पीठ घाला. आता पुरीसाठी भिजवतो त्यासम पीठ घट्ट मळून घ्या. भोपळा पाणी सोडतो त्यामुळे पाणी मुळीच वापरू नये. आता पोळपाटावर खसखस पसरून मिश्रणाचे लहान गोळे घेऊन खसखशीवर थापून घ्या. कढईत तेल किंवा तूप गरम करून घारगे तळून घ्या.





# राजस्थान रॉयलच्या गोलंदाजांचा भेदक मारा लखनौ सुपर जायंटला १५४ धावांमध्येच गुंडाळले



**आयपीएलमध्ये आज राजस्थान रॉयल विरुद्ध लखनौ सुपर जायंट यांच्यातील सामन्यात राजस्थानच्या भेदक माऱ्यासमोर लखनौच्या फलंदाजांनी अक्षरशः शरणागती पत्करली. सलामीवीर मेयर्सचे अर्धशतक आणि कर्णधार राहुलच्या ३९ धावा या व्यतिरिक्त लखनौच्या एकही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही . त्यातच लखनौच्या फलंदाजांनी अत्यंत संथ गतीने फलंदाजी केल्यामुळे २० षटकात त्यांना फक्त १५४ धावाच करता आल्या.**

■ जयपूर

**राजस्थान** रॉयलने नाणेफेक जिंकून लखनौला प्रथम फलंदाजी दिली. कर्णधार राहुल आणि मेयर्स यांनी ८२ धावांची भागीदारी केली पण त्यासाठी तब्बल १०.४ षटके घेतली. याचा अर्थ त्यांनी खूप संथ फलंदाजी केली. टी-२० मध्ये इतकी संथ फलंदाजी चालत नाही. दरम्यान होल्डरने राहुलला ३९ धावांवर बाद करून राजस्थानला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर आलेल्या बदोनीचा बोल्टने अवघ्या १ धावेवर त्रिफळा उडवला. पाठोपाठ अश्विनने दीपक हुड्डाला २ धावांवर तंबूत धाडले. तर अर्धशतक झळकावणारा मेयर्ससुद्धा अश्विनच्याच गोलंदाजीवर ५१ धावांवर त्रिफळाचित झाला. त्यामुळे १४ व्या षटकात लखनौच्या ४ बाद १०४ अशी स्थिती झाली होती. राहुल आणि मेयर्सनंतर लखनौचा एकही फलंदाज राजस्थानच्या गोलंदाजांशी मुकाबला करू शकला नाही. स्टोइनीस आणि निकोलस पूरण यांची जोडी जमली होती पण संदीप शर्माने स्टोइनिसला २१ धावांवर बाद करून ही जोडी फोडली. तर सांभाळून खेळणारा पूरण चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात २९ धावांवर धावचीत झाला. वाय सिंगी १ धावेवर धावचीत झाला. तर कृणाल पंड्या ४ धावांवर नाबाद राहिला. अशातऱ्हेने लखनौचा डाव १५४ धावांमध्ये गडगडला. राजस्थानच्या अश्विनने २ तर बोल्ट, संदीप शर्मा आणि होल्डर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

आजचे सामने 2023 IPL
KINGS वि. ROYAL CHALLENGERS — वेळ: ३.३०, स्थळ: मोहाली
DELHI CAPITALS वि. KKR — वेळ: ७.३०, स्थळ: दिल्ली

## लीवरपूलकडून लीड्सचा धुव्वा



**लंडन -** इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धेत पाच पराभवानंतर लिव्हरपूलला सूर सापडला आणि त्यांनी सहाव्या सामन्यात लीड्सचा ६-१ असा धुव्वा उडवला. लिव्हरपूलच्या या विजयात इजिप्तचा स्टार स्ट्रायकर मोहम्मद सलाह याच्या २ गोलचा समावेश आहे. डियोगो जोटा यानेही २ गोल केले. तर तोडी गाकपो आणि डार्विन नुनेज यांनी प्रत्येकी १ गोल केला. सहा आठवड्यापूर्वी युनायटेड मँचेस्टरला ७-० ने पराभूत केल्यानंतर लिव्हरपूलचा हा पहिला विजय आहे.

## आयपीएलमध्ये पुन्हा सट्टेबाजांची घुसखोरी सिराजला गळाला लावण्याचा डाव फसला

■ नवी दिल्ली

**आयपीएलमध्ये** मॅच फिक्सिंग करून श्रीसंतसह ९ खेळाडूंची कारकीर्द उद्ध्वस्त करणाऱ्या क्रिकेटमधील सट्टेबाजांनी पुन्हः एकदा आयपीएलमध्ये घुसखोरी केली आहे. यावेळी त्यांनी आरसीबीचा गोलंदाज मोहम्मद सिराज याला गळाला लावण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या मोहम्मद सिराजने सांगितले की, त्याला काही दिवसांपूर्वी एक कॉल आला होता, त्यात त्याच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याबाबत मोहम्मद सिराजने बीसीसीआयकडे तक्रार केली आहे. पीटीआयच्या बातमीनुसार, मोहम्मद सिराजने बीसीसीआयच्या अँटी करप्शन युनिटकडे याबाबतची तक्रार केली आहे. मोहम्मद सिराजने सांगितले की, एक अनोळखी व्यक्ती आयपीएलमध्ये खूप सारे पैसे गमावल्यानंतर त्याने संपर्क साधला होता. तसेच संघातील आतील माहिती विचारत होता. सिराजने याबाबतची माहिती तात्काळ बीसीसीआय अँटी करप्शन युनिटकडे दिली आहे. मोहम्मद सिराजशी संपर्क साधणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

## जय दत्तगुरु, साऊथ कॅनराची विजयी सलामी

■ मुंबई

लोअर परेल येथील नवोदित संघाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त श्रमिक जिमखाना मैदानात मुंबई जिल्हा स्तरावर तीन गटात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात जय दत्तगुरु क्रीडा मंडळ, साऊथ कॅनरा स्पोर्ट्स क्लबने विजयी सलामी दिली. पहिल्या फेरीच्या सामन्यात थरारक लढतीत जय दत्तगुरूने गोल्फादेवी सेवा मंडळाचा २८-२७ गुणांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात साऊथ कॅनराने वीर संताजी मंडळाचा ५-५ चढा यांच्या जादा डावात पराभव केला. करण गर्जे, सिद्धेश चव्हाण यांनी शानदार खेळ करून साऊथ कॅनराला विजय मिळवून दिला. महिला गटात श्री स्वामी समर्थने गोल्फादेवी संघाचा आरामात पराभव केला. दुसऱ्या सामन्यात चंद्रोदयने देखील भारतमाता क्लबवर सहज विजय मिळवला. कुमार गटात यंग विजयने वीर नेताजीचा, जय दत्तगुरुने साऊथ कॅनराचा, विजय बजरंगने हिंदकेसरीचा आणि आकांक्षा मंडळाने जय भारत क्रीडा मंडळाचा पराभव केला.

## दिल्लीच्या खेळाडूंचे सामान चोरीला

**नवी दिल्ली- इंडिगो** एअरलाइन्सच्या फ्लाईटमधून दिल्लीच्या खेळाडूंचे क्रिकेट किट चोरी झाले आहेत. याबाबत इंदिरा गांधी एअरपोर्ट पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. अनिल कुमार यादव नावाच्या व्यक्तीने याबाबतची तक्रार दिली आहे. अनिल कुमार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मी एक्सप्रेस फ्राइट सिस्टम इंडिया प्रायव्हेटमध्ये कर्मचारी आहे. १५ एप्रिल रोजी बेंगलोर ते दिल्ली इंडिगो फ्लाईटमध्ये दिल्ली कॅपिटल्सच्या खेळाडूंचे क्रिकेट सामान बुकिंग झाले होते.

## १९ बॉक्सर ताशकंदकडे रवाना

**दिल्ली -** वर्ल्ड बॉक्सिंग चँपियनशिप स्पर्धेसाठी भारताचे १९ बॉक्सर ताशकंदकडे रवाना झाले आहेत. या स्पर्धेतील विजेत्याला दोन लाख डॉलर, रजत पदक विजेत्याला १ लाख डॉलर तर कांस्य पदक विजेत्याला ५० हजार डॉलरचे बक्षीस दिले जाणार आहे ही स्पर्धा ३० एप्रिल पासून १४ मे पर्यंत खेळवली जाणार आहे.

**अनुसूची I**
**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)

**एसएम लाईन कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | एसएम लाईन कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक | १५.०२.२०१७ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणी झाली | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U63030MH2017FTC291209 |
| ५. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालय पत्ताः १३०६/२, विजय गॅलेक्सी, वाघबिळ नाका, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम), मुंबई शहर महा. ४००६१५ भारत |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | १८ एप्रिल, २०२३ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. प्रणव दमानिया IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164 पत्ताः ४०७, संजर एन्क्लेव्ह, महिंद्रा शोरूमवर, मिलाप सिनेमासमोर, एस. व्ही. रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७. ईमेल आयडीः pranav@winadvisors.co.in पर्यायी ईमेल आयडीः pranav@consultinsolvency.com सेलः +९१९८२०४६९८२५ |
| ८. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | परिसमापन सुरू झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांमध्ये |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **एसएम लाईन कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड**ने **१८ एप्रिल, २०२३** रोजी ऐच्छिक परिसमापन सुरू केले आहे.
**एसएम लाईन कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे **दि. १८ मे, २०२३** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
सही/-
प्रणव दमानिया
**एसएम लाईन कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड** यांचे परिसमापक
नोंदणीकरण क्रमांकः IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164
नियुक्तीकरिता प्राधिकृतता ("एएफए")
एएफए क्र.: AA1/10164/02/231223/105289
एएफए वैधताः २३ डिसेंबर, २०२३
दिनांक : १९ एप्रिल, २०२३
ठिकाण : मुंबई

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **नाजू एच चिब्बर** (दिवंगत), **पर्सी जल चिब्बर, दारियस जल चिब्बर आणि होमी जल चिब्बर** यांच्या नावे असलेली दर्शनी मूल्य रु. २/- असलेल्या १३५६ इक्विटी समभागांकरिता फोलियो क्रमांक एन - ६८२९८, प्रमाणपत्र क्रमांक ३०६४२१ आणि ४१२८७७, डिस्टिंक्टीव्ह क्रमांक १४७२४७३६५ - ७८१६ (४५२ समभाग); ५८४८८१६०३ - ५८४८८२५०६ (९०४ समभाग), आणि ७४८ समभागांकरिता फोलियो क्रमांक ७०५३३१७१, प्रमाणपत्र क्रमांक ११३१५२, २६०४०१, ४६७०३२; डिस्टिंक्टीव्ह क्रमांक ६०३५२५३ - ६०३५४३९ (१८७), १४३९१५१७५ - १४३९१५३६१ (१८७), ६२०९३९०६७ - ६२०९३४४० (३७४), एकूण २१०४ इक्विटी समभागांकरिता **लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड**ची प्रमाणपत्रे हरवली आहेत किंवा अप्रस्थापित झाली आहेत आणि निम्नस्वाक्षरीकारांनी कंपनीकडे सदर भागांकरिता दुय्यम प्रमाणपत्र(त्रे) पारित करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणा व्यक्तीचा सदर समभागांच्या संदर्भात कोणताही दावा असल्यास त्यांनी या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आमचे निबंधक, मे. केफिन टेक्नोलॉजिस लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गोचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, हैदराबाद - ५०००३२ यांना लिहून कळवावे, अन्यथा कंपनी दुय्यम प्रमाणपत्र(त्रे) पारित करण्याची प्रक्रिया सुरू करतील.
**भागधारका(कां)ची नाव(वे):**
**पर्सी जल चिब्बर, दारियस जल चिब्बर आणि होमी जल चिब्बर**

**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**

**शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय**

उल्हासनगर महानगरपालिका शहरामधील खाली नमुद ०३ कामे योग्य वर्गातील ठेकेदाराकडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक २०/४/२०२३ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती **www.umc.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | रक्कम | टक्केवारी | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमपा / साबांवि/ नोटीस/ २०२२-२३/३/१ | उल्हासनगर- ३ प्रभाग क्र.९ मधील महात्मा फुलेनगर ठिकाणी सि. सि. पेव्हमेंट व नाली बनविणे | १०००००० | १% | १ महिने | VI TH |
| २ | उमपा / साबांवि/ नोटीस/ २०२२-२३/३/२ | उल्हासनगर- ३ प्रभाग क्र. ९ मधील शेरावाली बिल्डींग शिव कॉलनी व विविध ठिकाणी सि. सि. पेव्हमेंट रोड व नाली बनविणे | १०००००० | १% | १ महिने | VI TH |
| ३ | उमपा / साबांवि/ नोटीस/ २०२२-२३/३/३ | उल्हासनगर- ५ प्रभाग क्र.१९ मधील गणेशनगर मधील सि. सि. पेव्हमेंट व नाली बनविणे | १०००००० | १% | १ महिने | VI TH |

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती **www.umc.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सही/-
कार्यकारी /शहर अभियंता
उल्हासनगर महानगरपालिका

जा. क्र. / उमपा/ पिआरओ/१६१/२०२३
दि.१९/०४/२०२३